लोकमत

# शिरपुरात ३६७ दात्यांनी केले उत्स्फूर्त रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** एसव्हीकेएम संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री अमरीशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे, सावळदे आणि दहिवद येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. धुळे येथील एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी येथे १६७, सावळदे कॅम्पसमध्ये १४८, तर दहिवद येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये ५२ अशा एकूण ३६७ दात्यांनी रक्तदान केले.

या शिबिरांचे आयोजन अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनतर्फे करण्यात आले होते. याआधी माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ६७९ दात्यांनी रक्तदान केले होते. दहिवद येथील शिबिरात प्राचार्य डॉ. नितीन पाटील आणि प्रशांत अग्रवाल यांनी सहभाग घेतला. यशस्वी आयोजनात द्वेताबेन भूपेशभाई पटेल यांचे विशेष प्रयत्न होते.

**१४८**

दात्यांनी सावळदे कॅम्पस येथे उत्स्फूर्त रक्तदान केले.

## मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

सावळदे येथील एसव्हीकेएम कॅम्पसमध्ये आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार काशीराम पावरा आणि एसव्हीकेएम व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते झाले. यावेळी सावळदे कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, डेप्युटी रजिस्टर भूपेश जावरे, अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशन टीम, समन्वयक सोनिया भसीन, सुनील जैन, योगेश्वर माळी, अधिकारी, प्राध्यापक आदी उपस्थित होते.

**PUBLICATION: LOKMAT**

**EDITION: DHULE**